# लोकप्रतिनिधित्व कायदयाचे बदलते निकष : एक विश्लेषण

**प्रा. डॉ. प्रदीप पंजाबराव दंदे, महिला कला वाणिज्य महाविद्यालय चांदूर रेल्वे, जिल्हा अमरावती**

……………………………………………………………………………………………….

**प्रस्तावना :**

कोविड-१९ चे राज्यात संकट असतानाही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मुख्यमंत्री पदाचा घटनात्मक पेच निर्माण झाल्याने विधानपरिषदेच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत विधानसभेतील संख्याबळानुसार भारतीय जनता पक्षाच्या वतीने माजी खासदार रणजितसिंह मोहिते पाटील, धनगर समाजाचे नेते गोपीचंद पडळकर, नागपूरचे माजी महापौर प्रवीण दटके आणि राजेश कराड तसेच कॉंग्रेसचे राजेश राठोड व शिवसेनेचे उद्धव ठाकरे, नीलम गोऱ्हे, आणि राष्ट्रवादीचे शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी हे निवडून आलेत.

विधानपरिषद निवडणुकीत भाजपकडून माजी महसूल मंत्री एकनाथ खडसे, माजी महिला व बाल कल्याण मंत्री पंकजा मुंडे, माजी शिक्षण मंत्री विनोद तावडे, माजी ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना संधी मिळेल, अशी आशा होती. परंतु, त्यात डावलले गेल्यामुळे एकनाथ खडसे यांनी भाजपवर शरसंधान साधले आणि निष्ठावंतांना तिकिटे नाकारली जातात व बाहेरून आलेल्यांना उमेदवारी देण्यात येते, असा आरोप केला. त्यावर प्रतिक्रिया देताना महाराष्ट्र भाजप अध्यक्ष, माजी मंत्री चंद्रकांतदादा पाटलांनी आमदारकीच्या जागा चार आणि मागणारे चाळीस त्यामुळे अनेकजण नाराज होतात. यातून मार्ग काढायचा म्हटले तर कोल्हापूर महापालिकेत महापौर पद ज्याप्रमाणे तीन-तीन महिने वाटून घेतल्या जाते. त्या धर्तीवर आमदारकी सुद्धा तीन- तीन महिने वाटून देण्याचा प्रस्ताव येत्या विधानसभा अधिवेशनात मांडणार असल्याचे माध्यमांना सांगितले.

आमदारकी तीन-तीन महिने वाटून दिल्यास अनेकांना आमदारकी भोगायची संधी मिळेल. अशी या प्रस्तावामागची धारणा असावी. चंद्रकांत दादांच्या या वक्तव्यामुळे लगतच्या काळात संसदीय राजकारणात जगमान्य असलेला पाच वर्षांचा कालावधी इतिहासजमा होऊन कोल्हापुरच्या महापौरपदाप्रमाणे आमदारकी, खासदारकी तीन-तीन महिने वाटून घेण्याच्या नव्या पर्वाला सुरुवात होईल, असे ह्या प्रस्तावाचे सुतोवाच आहे.चंद्रकांत दादांचा प्रस्ताव विधानपरिषद सदस्यासाठी की विधानसभा सदस्यासाठी? यात संभ्रम आहे. विधानसभेबाबत चंद्रकांतदादांचा प्रस्ताव असेल तर त्यांचा कोथरूड मतदार संघ 'मॉडेल' म्हणून वापरता येईल. त्या मॉडेलच्या यशापयशावर मग इतर ठिकाणी त्याचा प्रयोग करता येईल.

ज्या कोल्हापुर महानगरपालिकेचे उदाहरण दादांनी दिले त्या कोल्हापूर महानगरपालिकेत तीन महिने महापौरपदाचा काय परर्फोर्मंस राहिला हे कोल्हापूर विद्यापीठातील एका राजकीय अभ्यासक मित्राला विचारले असता मागील आठ-दहा वर्षांचा विचार केल्यास 'माजी महापौर' हे बिरूद लावण्यापलीकडे काहीच उपयोग झाला नाही. महापौरपद केवळ 'शोबज' बनले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेतील खरी सत्ता गटाधिपती, आमदार, मंत्री हेच वापरतात.

राज्यकर्त्यांनी मग तो सत्ताधारी असो की, विरोधक सर्वांनी स्थानिक स्वराज्य संस्थेला बळकट करण्याऐवजी मागील पाव शतकात पंचायतराजमध्ये वेगवेगळे प्रयोग करून स्थानिक सरकारचे व त्यातील पदाधिकाऱ्यांचे हसे केले आहे. तोच कित्ता आपण राज्यविधिमंडळ सदस्य असलेल्या आमदारकीचे करू पाहत असू, तर मग आपणाला कोणत्या प्रकारची लोकशाही अपेक्षित आहे? राजकीय पक्षांचे वर्तन लोकशाहीच्या नावाखाली अथोरिटेरियन सत्ताधिशाप्रमाणे सुरू आहे, हेच खरे!

राज्यात विधानसभेतून विधान परिषदेवर पाठवावयाच्या नऊ जागा रिक्त होत्या. परंतु कोरोना संकटामुळे निवडणूक आयोगाने निवडणुका पुढे ढकलल्या होत्या. मात्र घटनात्मक पेच सोडविण्यासाठी राज्यपाल तसेच तीन प्रमुख राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगाला निवडणुका घेण्यासंबंधीचे एक विनंतीपत्र दिले; आणि त्यात निवडणूका घेण्याची गरज प्रतिपादन केली. त्यानुसार विधानपरिषद निवडणूक घेतली गेली आणि, विशेष म्हणजे ती निवडणूक बिनविरोध झाली!

या निवडणुकीतील असंतोषावर मत व्यक्त करताना चंद्रकांत दादांनी हा प्रस्ताव येत्या विधानसभा अधिवेशनात मांडत असल्याचे म्हटले. त्यांचे हे मत संसदीय लोकशाहीने लोकप्रतिनिधींना पाच वर्षाचा (विधानपरिषद सदस्य असेल तर सहा वर्षाचा) अवधी बहाल करून दिला त्या तत्त्वाला तिलांजली देणारा आणि लोकप्रतिनिधींवर अन्याय करणारा आहे.

संसदीय लोकशाहीत "लोकप्रतिनिधीत्वाला" (Peoples Representation) अनन्य साधारण महत्त्व आहे. लोकप्रतिनिधी हा धोरण निर्धारण प्रक्रियेतील (Policy Decision Making Process) महत्त्वाचा घटक आहे. 'ज्या देशात पार्लमेंट नाही, त्या देशात लोकशाही नाही.' असे मानल्या जाते.(There is no Parliament, there is no Democracy) लोकप्रतिनिधींच्या संमतीशिवाय केंद्र व राज्याचे कायदे, नियम तयार होत नाही, तसेच सरकार चालत नाही. जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींमार्फतच सरकार राबविणे हे संसदीय लोकशाहीचे धोरण आहे. याअर्थाने विचार केल्यास विरोध वा समर्थन या दोन्ही बाबतीत लोकप्रतिनिधींचे स्थान किती महत्त्वपूर्ण असते, हे सहजच लक्षात येईल.

संसदीय लोकशाहीत लोकप्रतिनिधी व राजकीय पक्षांचे वर्तन संसदीय परंपरेला अनुसरून असावयास हवे असते. मात्र, अनेक राजकीय पक्ष बहुमताच्या जोरावर वाटेल त्याप्रमाणे लोकशाही संकेताना पायदळी तुडवताना दिसून येतात. चंद्रकांतदादांचा विचार सुद्धा त्याच वर्गवारीतील आहे.'लोक प्रतिनिधित्व' सहजासहजी मिळाले नाही, त्यासाठी इतिहासात अनेक आंदोलन झाली आहेत. राजेशाहीत असलेली वंशपरंपरा नाकारून प्रातिनिधिक लोकशाही प्रस्थापित केली गेली आहे.

पहिले उदाहरण द्यायचे झाल्यास ते अमेरिकेचे देता येईल. इंग्लंडच्या अधिपत्याखाली असलेल्या अमेरिकन वसाहतींनी इंग्लंडच्या संसदेत अमेरिकन लोकांना प्रतिनिधित्वाची मागणी केली. त्याला इंग्लंडच्या सरकारने विरोध केला. त्याविरोधात अमेरिकन नागरिकांनी 'ना प्रतिनिधित्व - ना कर' हा नारा देत ब्रिटिश सत्तेविरुद्ध आंदोलन उभे केले होते. त्याची परिणती पुढे अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात झाली व अमेरिका हे स्वतंत्र लोकशाही राष्ट्र निर्माण झाले.

दुसरे उदाहरण द्यायचे तर- भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात भारताच्या स्वातंत्र्याची मागणी होती. त्यात दलितांचे स्थान काय म्हणून डॉ.आंबेडकरांनी दलितांच्या राजकीय हक्काची मागणी केली व त्यातून 'पुणे करार' अस्तित्वात आला. १९३५ च्या कायद्यान्वये इतर समुहांसोबत दलितांनाही प्रतिनिधित्व मिळाले, हा इतिहास आहे. संविधानसभेत दलितांचे प्रश्न मांडता यावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधानसभेत गेले होते. डॉ.आंबेडकर संविधानसभेत होते, म्हणून ते भारतीय संविधानाचे शिल्पकार झाले. यातून प्रतिनिधित्वाचे मोल काय ते कळते.

लोकप्रतिनिधी हा केवळ संसद, राज्याच्या विधानमंडळातील केवळ एक बाहुला नाही, तर लोकशाहीची बूज राखणारा तो जनतेचा प्रतिनिधी आहे, या नात्याने त्याची निवड होणे संसदीय लोकशाहीला अपेक्षित आहे. परंतु, पक्षीय राजकारणाने लोकप्रतिनिधी हे राजकीय पक्षाचे 'पपेट' बनवले गेले आहेत! संसदीय लोकशाहीत प्रतिनिधित्व कालावधी हा पाच वर्षे असताना तीन-तीन महिन्यांचा पर्याय सुचवला जाणे हे गैरच नव्हे तर संविधान कक्षेच्या बाहेरचा पर्याय आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

अमेरिकेच्या प्रतिनिधिगृहाचा कालावधी हा केवळ दोन वर्ष असल्याने लोकप्रतिनिधिगृहापेक्षा अमेरिकेतील सिनेट आज जगातील सर्वात शक्तिशाली सदन म्हणून नावारूपाला आलेली आहे. लोकप्रतिनिधिगृह म्हणूनही प्रतिनिधी सभागृह आपला दबदबा निर्माण करू शकली नसल्याचे महत्त्वाचे कारण त्या सभागृहाचा कमी कालावधी हा आहे. त्यामुळे राजकारणात आपला ठसा उमटवण्यासाठी सदस्यांना किमान पाच वर्षाचा कालावधी जगाने मान्य केला आहे. त्यामुळे त्याचे लचके तोडण्याचा प्रकार हा पक्षीय हुकूमशाहीचे दर्शन घडवणारा आहे.

आपल्याला प्रातिनिधिक लोकशाहीत केवळ अनेकांना संधीच द्यायची तर नायक चित्रपटाप्रमाणे एक दिवसाचा मुख्यमंत्री, आमदार, एक दिवसाचा पंतप्रधान केल्यास देशातील कोट्यावधी लोकांना पंतप्रधान, आमदार, मंत्री, महापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष बनण्याची संधी मिळेलही! परंतु, ज्या भूमिकेतून आपण ही लोकशाही व्यवस्था निर्माण केली आणि स्वीकारली त्या ध्येय्यांचे काय? एक दिवसाचा वा तीन महिन्याचा आमदार केल्यास लोकशाही अधिक सक्षम होईल? महाराष्ट्रात दीड दिवसाच्या मुख्यमंत्र्यांनी काय दिवे लावले, हे महाराष्ट्राने

**पाहिलेलेच आहे. त्यामुळे चित्रपटात एखादी घटना चांगली वाटत असली तरी वास्तवात ती यशस्वी होईलच, असे नाही. ते fiction असते. ही reality असते! परंतु समजा असे झाले, तरी संसदीय प्रणालीत संसद व विधिमंडळाचे अधिवेशन वर्षातून दोन वेळ झालेच पाहिजे, असा नियम आहे. भारतात वर्षातून उन्हाळी (बजट अधिवेशन), पावसाळी व हिवाळी असे अधिवेशन होतात. तीन तीन महिने आमदार पद वाटून घेतल्याने अनेकांना विधिमंडळात उपस्थित राहता येणार नाही. ज्याला संधी मिळाली त्याला पुढल्या अधिवेशनात बसता येणार नाही. त्यामुळे तीन महीने आमदारकीचे औचित्य तरी काय ? आमदारकी वाटून घेतल्याने अनेकांना आमदार होण्याची संधी द्याल. परंतु, लोकशाहीत लोकप्रतिनिधीना बहाल केलेल्या पाच वर्ष अधिकार पदाचे क़ाय? कोल्हापुर महापौर पदाप्रमाणे आमदारकीचे लचके तोडण्यापेक्षा लोकप्रतिनिधीना संविधानाने ठरवून दिलेल्या कालावधीत त्याच्या नावाचा ठसा कसा उमटवेल यासाठी राजकीय पक्षानी प्रयत्न करावे, एवढेच!**

**Reference :**

1.https://youtu.be/TQB5XO3yArg
2.https://www.tv9marathi.com/politics/chandrakant-patil-exclusive-interview-why-pankaja-munde-did-not-get-vidhan-parishad-candidature-219140.html
3.https://dainikekmat.com/featured/no-rehabilitation-of-pankaja-munde-khadse-bavankule-tawde-4965/
4.https://www.saamana.com/eknath-khades-election-bjp-maharashtra-politics/
5.https://maharashtratimes.com/maharashtra/mumbai-news/maharashtra-legislative-council-election-eknath-khadse-lashes-bjp-state-president-chandrakant-patil/amp_articleshow/75732943.cms
6. https://www.mumbailive.com/amp/en/politics/bjp-maharashtra-president-chandrakant-patil-reacts-on-eknath-khadse-comment-over-vidhan-parishad-election-49629